जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

## प्रेसनोट क्रमांक - ३९० दिनांक - २६/०५/२०२३

### अंमली पदार्थ विरोधी पथक-१,गुन्हे शाखा,पुणे शहर

### एल.एस.डी.अंमली पदार्था तस्करी गुन्हयाचे तपासात ०५ अटक आरोपींकडुन कि.रु.१,१४,३०,००० चा एकुण ४१,९८६ मिलीग्रॅम "एल.एस.डी." अंमली पदार्थाचा मोठा साठा जप्त .

**कोथरुड पोलीस ठाणे गुरनं.११९/२०२३,एनडीपीएस ॲक्ट ८(क),२२(क),२९** या गुन्हयाचा तपास मा. अपर पोलीस आयुक्त,गुन्हे पुणे शहर, मा.पो उप आयुक्त,गुन्हे पुणे शहर,मा.सहा पो आयुक्त,गुन्हे १ पुणे शहर यांचे सुचनानुसार अंमली पदार्थ विरोधी पथक १ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.विनायक गायकवाड यांचे मार्गदर्शनानुसार सहा.पो.निरीक्षक,शैलजा जानकर अंमली पदार्थ विरोधी पथक-१,गुन्हे शाखा,पुणे शहर हया करीत असताना, गुन्हया तील अटक आरोपी **१)रोहन दिपक गवई,वय २४ वर्षे,रा.सध्या स्वापनंदा हाऊसिंग सोसा,फ्लॅट नं.३३ डिपी रोड,कर्वे पुतळा,पुणे २)सुशांत काशिनाथ गायकवाड,वय २६ वर्षे,रा.ठक्कर रेसीडन्सी,संभाजीनगर,कोडोली सातारा सध्या रा.बी-८०१,पेरिविन्कंल सोसायटी,ननावरे चौक,बाणेर,पुणे ३)धिरज दिपक लालवाणी,वय २४ वर्षे, रा.फ्लॅट नं.ए-१४,जी-३,प्लॅनेट मिलीनियम,पिंपळे-सौदागर,पुणे ४)दिपक लक्ष्मण गेहलोत,वय २५ वर्षे,रा.डि-२ फ्लॅट नं.५०१,शिवसागर सिटी,फेज नं.१,सनसिटी रोड,आनंदनगर,पुणे ५)ओंकार रमेश पाटील,वय-२५ वर्षे रा. स.नं.१०८/३/१/बी,पाटील साई व्हिला,वाकड,पुणे** यांचा प्राप्त झालेले माहितीचे अनुषंगाने बाणेर,सिंहगड रोड, पिंपळे सौदागर,वाकड परिसरातुन शोध घेऊन अटक करण्यात आलेली असुन,आरोपी क्रं.१,३,५ यांचे ताब्यातुन किं.रु.५३,३५,०००/- त्यामध्ये किं.रु. ५१,६०,०००/- चे एलएसडी अंमली पदार्थाचे १७ ग्रॅम वजनाचे १०३२ तुकडे व इतर ऐवज दि.२४/०५/२०२३ रोजी हस्तगत करण्यात आलेला होता.

दाखल गुन्हयातील पोलीस कस्टडी रिमांडमधील **मुख्य आरोपी ओंकार रमेश पाटील** याचेकडे दि.२५/०६/२०२३ रोजी रिमांड कालावधीत विश्वासात घेऊन तपास करता त्याने , दाखल गुन्हयातील जप्त मुद्देमालाव्यतिरिक्त विक्रीकरिता आणलेला आणखीन एलएसडी अंमली पदार्थ हा त्याचे रहाते घराचे परिसरात त्याचे ॲक्टीव्हा गाडीचे डिक्कीत लपवुन ठेवला असल्याची खात्रीशिर माहिती दिलेने, त्याअनुषंगाने सखोल तपास करता अटक आरोपीचे मदतीने कि रु ६३,००,३००/- चा त्यामध्ये **कि.रू. ६२,७०,०००/- चे २४ ग्रॅम ९८६ मिलीग्रॅम वजनाचे एलएसडी अंमली पदार्थ** किं.रु. ३०,०००/- ची एक पांढरे रंगाची ॲक्टीव्हा गाडी तसेच इतर ऐवज हस्तगत करुन पंचनाम्याने जप्त करण्यात आलेला आहे. "दाखल गुन्हयाचा सखोल तपासात अटक आरोपीतांनी **"डनजो या ऑनलाईन फुड डिलीव्हरी ॲप"** चा दाखल गुन्हयातील एल.एस.डी. या अंमली पदार्थाची खरेदी-विक्री करण्याकरिता वापर केल्याचे निष्पन्न झालेले आहे."

दाखल गुन्हयाचे दि.२५/०५/२०२३ रोजीपावेतो केलेले तपासात उपरोक्त पोलीस कस्टडी रिमांड मधील आरोपींकडुन एकुण किं.रु.१,१६,३५,३००/- **(एक कोटी सोळा लाख पस्तीस हजार तिनशे रु.)** किंवा त्यामध्ये **किं.रु.१,१४,३०,०००/-** चे **४१ ग्रॅम ९८६ वजनाचे एलएसडी अंमली पदार्थाचे २,३०७ चौकोनी तुकडे व ०२ दुचाकी गाडी, मोबाईल हॅण्डसेट** व इतर ऐवज हस्तगत करण्यात आलेला असुन,दाखल गुन्हयाचा आणखीन सखोल तपास करीत आहोत.

सदरची उल्लेखनीय कामगिरी ही मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त,श्री.संदिप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,श्री.रामनाथ पोकळे, मा.पोलीस उप आयुक्त,गुन्हे, श्री.अमोल झेंडे, मा.सहा.पोलीस आयुक्त,गुन्हे-१,श्री.सुनिल पवार यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी पथक,१,गुन्हे शाखा,पुणे शहरकडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक,विनायक गायकवाड, सहा.पोलीस निरीक्षक,शैलजा जानकर, पोलीस अंमलदार,विशाल शिंदे, योगेश मोहिते, मारुती पारधी, सुजित वाडेकर, मनोजकुमार साळुंके, पांडुरंग पवार, ज्ञानेश्वर घोरपडे, प्रविण उत्तेकर, विशाल दळवी, संदिप शिर्के, राहुल जोशी, संदेश काकडे, नितेश जाधव, सचिन माळवे, रेहाना शेख यांनी केली आहे.